कार्यालय, पोलीस उप अधिक्षक,
लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना
टोल फ्री क्रमांक - 1064
कार्यालय दुरध्वनी क्र :- 02482-220252
ई मेल - dyspacbjalana@gmail.com

:: प्रेस नोट :: दिनांक :- ०८.०९.२०२१.

**रमाई आवास योजने अंतर्गत घरकुल योजनेचा हप्ता खात्यावर जमा करण्यासाठी पंचायत समिती परतुर जि. जालना येथील ग्रामीण गृह निर्माण अभियंता श्री. वैभव बाळासाहेब पिंपळे यांना ३,०००/- रुपयेची लाच स्विकारतांना पकडले.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | लोकसेवक श्री.वैभव बाळासाहेब पिंपळे, वय २४ वर्ष व्यवसाय कंत्राटी, ग्रामीण गृह निर्माण अभियंता, पंचायत समिती, परतुर जि. जालना रा. आदर्श कॉलनी परतुर जि. जालना |
| २ | गुन्हा घ ता व ठीकाण | :- | दि- ०८.०९.२०२१ रोजी कॉलेज रोड, परतुर जि. जालना येथे |
| ३ | लाच स्विकारली रक्कम | :- | ३,०००/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, त्यांना रमाई घरकुल आवास योजने अंतर्गत घरकुल अनुदान मंजुर झाले होते, त्यांचे घरकुल अनुदानाचा शेवटचा हप्ता २०,०००/- रुपये त्यांचे खात्यावर जमा करण्यासाठी त्यांनी पंचायत समिती, परतुर जि. जालना येथे जावुन अर्ज केला असता तेथील श्री. वैभव बाळासाहेब पिंपळे कंत्राटी, ग्रामीण गृह निर्माण अभियंता यांनी त्यांना तक्रारदार यांचे मंजुर घरकुल अनुदानाचा शेवटचा हप्ता २०,०००/- रुपये त्यांचे खात्यावर जमा करण्यासाठी १,०००/- रुपये व तक्रारदार यांचे काकांचे मंजुर घरकुल अनुदानाचा तिसरा हप्ता त्यांचे काकांचे खात्यावर जमा करण्यासाठी २,०००/- रुपये असे एकुण ३,०००/- रुपये लाचेची मागणी केली. सदर कामासाठी तक्रारदारास श्री. वैभव बाळासाहेब पिंपळे कंत्राटी, ग्रामीण गृह निर्माण अभियंता यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली.

सदर तक्रारीवरून दि. ०८.०९.२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना यांनी लाच मागणी पडताळणी केली असता श्री. वैभव बाळासाहेब पिंपळे कंत्राटी, ग्रामीण गृह निर्माण अभियंता यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे मंजुर घरकुल अनुदानाचा शेवटचा हप्ता २०,०००/- रुपये त्यांचे खात्यावर जमा करण्यासाठी १,०००/- रुपये व तक्रारदार यांचे काकांचे मंजुर घरकुल अनुदानाचा तिसरा हप्ता त्यांचे काकांचे खात्यावर जमा करण्यासाठी २,०००/- रुपये असे एकुण ३,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पण्ण झाले, तसेच तक्रारदार यांचेकडुन श्री. वैभव बाळासाहेब पिंपळे कंत्राटी, ग्रामीण गृह निर्माण अभियंता यांना ३,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालनाचे पथकाने परतुर जि. जालना येथील कॉलेज रोडवर पकडले आहे.

लोकसेवक श्री.वैभव बाळासाहेब पिंपळे, वय २४ वर्ष व्यवसाय कंत्राटी, ग्रामीण गृह निर्माण अभियंता, पंचायत समिती, परतुर जि. जालना रा. आदर्श कॉलनी परतुर जि. जालना यांचे विरुध्द पोलीस ठाणे परतुर जि. जालना येथे गुन्हा दाखल करणे बाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास ०२४८२-२२०२५२, तसेच टोल फ्री क्रमांक १०६४ वर संपर्क करावा. तसेच पोलीस निरीक्षक मो.नं. ८३९०७५७८३५, ९८२३२१६७८८ वर संपर्क करावा.**

०८/०९/२१

पोलीस उप अधिक्षक,
ला प्र वि, जालना.